# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## सहकार विभागातील अधिका-यांकरिता विभागीय परीक्षा

मुंबई, गुरुवार, दिनांक ९ ऑगस्ट २०१८

[ **वेळ** : सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० ]

**(एकूण गुण–५०)**

**पेपर क्रमांक १**

## डिपार्टमेंटल अकाऊंट्स रुल्स, पॉवर्स ऑफ रजिस्ट्रार, जॉईंट रजिस्ट्रार, वगैरे

(पुस्तकांशिवाय)

**सूचना.**—(१) प्रश्नपत्रिकेतील **भाग 'अ'** मधील कोणतेही **तीन** व **भाग 'ब'** मधील कोणतेही **दोन** असे एकूण **पाच** प्रश्न सोडवा.

(२) प्रत्येक प्रश्नाला **दहा** गुण आहेत.

(३) विनिर्दिष्ट संख्येपेक्षा जास्त प्रश्नांची उत्तरे दिल्यास त्यांना गुण दिले जाणार नाहीत.

(४) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

(५) उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

(६) प्रश्नांची उत्तरे **मराठी** वा **इंग्रजी** एकाच भाषेत लिहावयाची आहेत.

**गुण**

### भाग - "अ"

(कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा)

१. खाली नमूद केलेल्या योजनाना तसेच सहकारी संस्थांना देण्यात येणा-या शासकीय अर्थसहाय्याचा आकृतीबंध विशद करा व त्यास मंजुरी देणारे सक्षम प्रधिकारीसुद्धा नमूद करा. (कोणतेही **दोन**) :— १०

(अ) औद्योगिक सहकारी संस्था.

(ब) कृषि प्रक्रिया संस्था.

(क) डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना.

(ड) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना.

२. खाली नमूद केलेल्या योजना विशद करून त्यांना मंजुरी देणारे प्राधिकारी नमूद करा. (कोणतेही **दोन**) :— १०

(अ) राज्यातील शेतक-यांना वार्षिक ६% व्याज दराने अल्पमुदत पीक कर्ज पुरवठा करणेसाठी बँकांना व्याज परतावा.

(ब) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाना बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य योजना.

(क) सहकारी संस्थाना गोदामे बांधण्यासाठी अर्थसहाय्य योजना.

(ड) अनुसूचित जाती/जमातीच्या व्यक्तींना सहकारी साखर कारखान्याचे भाग खरेदी करणेसाठी अर्थसहाय्य योजना.

[ उलटून पहा

गुण

३. खाली नमूद केलेल्या कृतीवर भाष्य करा (कोणतेही **पाच**) :— १०

(अ) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था हे सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या बदल्या करतात.

(ब) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था हे त्यांचे विभागातील वर्ग-३ च्या कर्मचा-यांच्या पदोन्नती करतात.

(क) साखर आयुक्त हे त्यांचे कार्यालयासाठी रु. १.०० लाख किमतीचे फर्निचर खरेदी करतात.

(ड) सहायक निबंधक, सहकारी संस्था हे त्यांचे कार्यालयीन भाडे अदा करतात.

(इ) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था हे त्यांचे विभागातील सहायक निबंधक, सहकारी संस्था यांची १८० दिवसांची अर्जित रजा मंजूर करतात.

(फ) प्रादेशिक सहसंचालक त्यांचे कार्यालयातील कर्मचा-यांना ४५ दिवसांची अर्जित रजा मंजूर करतात.

(ग) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था हे त्यांचे विभागातील जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांच्या दैनंदिन्या मंजूर करतात.

४. खाली नमूद केलेले अधिकार वापरणारे सक्षम प्राधिकारी नमूद करा. (कोणतेही **पाच**) :— १०

(अ) सहकारी साखर कारखान्यांची नोंदणी.

(ब) नागरी सहकारी बँकेच्या उपविधी दुरुस्तीस मंजुरी.

(क) जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार.

(ड) सहकारी गृहनिर्माण संस्थेची निवडणूक.

(इ) सहकारी गृहनिर्माण संस्थेचे 'मानीव अभिहस्तांतरण' मंजूर करून देणे.

(फ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १३ अन्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी दिलेल्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करून घेण्याचे अधिकार.

(ग) कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्तीकरिता नोटीस बजाविण्याचे अधिकार.

## भाग - "ब"

(कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा)

५. फरक स्पष्ट करा (कोणतेही **दोन**) :— १०

(अ) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था **व** आयुक्त, राज्य निवडणूक प्राधिकरण

(ब) अपील **व** पुनरीक्षण

(क) नागरी सहकारी बँक **व** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

(ड) वार्षिक सर्वसाधारण सभा **व** विशेष सर्वसाधारण सभा.

गुण

६. संक्षिप्त टिपणी लिहा (कोणत्याही **दोन**) :— १०

(अ) सहकारी न्यायालये.

(ब) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण.

(क) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ खालील निबंधकाचे अधिकार.

(ड) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७अ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे.

७. (अ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र देण्याची पद्धत विशद करा. ५

(ब) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ खालील चौकशी. ५

[ उलटून पहा

# MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

## DEPARTMENTAL EXAMINATION FOR OFFICERS OF THE CO-OPERATION DEPARTMENT

MUMBAI, THURSDAY, 9TH AUGUST 2018

[TIME—10-00 A.M. TO 12-00 NOON]

(FULL MARKS—50)

## PAPER I

## DEPARTMENTAL ACCOUNTS RULES, POWERS OF REGISTRAR, JOINT REGISTRAR, ETC.

*(Without Book)*

*N.B.*—(1) Answer any *Three* questions from Part 'A' and any *Two* questions from Part 'B' in total *five* questions.
(2) Each question will have Ten marks.
(3) No Marks will be awarded for questions answered in excess of *five*.
(4) Candidate should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.
(5) Candidates are expected to answer all the sub-questions of a question together, if sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later sub-question shall be overlooked.
(6) Answers are to be written in one language only either in *Marathi* or in *English*.

**Marks**

## PART "A"

(Solve any *three* questions.)

1. Explain the pattern of financial assistance by Government to the following societies or Schemes ; also state authority competent to sanction the same (any *two*) :— 10

(*a*) Industrial Co-operative Societies

(*b*) Agro Processing Societies.

(*c*) Dr. Punjabrao Deshmukh Interest Rebate Scheme.

(*d*) Chhatrapati Shivaji Maharaj Shetkari Sanman Yojana.

2. Explain the scheme and state authority to sanction the same (any *two*) :— 10

(*a*) Interest subvention scheme to Banks by the State Government for supply of Short term credit to farmers at the rate of 6% per annum.

(*b*) Financial Assistance to Primary Agriculture Society for strengthening.

(*c*) Financial Assistance to Co-operative Societies for construction of godowns.

(*d*) Financial Assistance to the people of Scheduled Caste/Tribe for the purchase of shares of Co-operative Sugar Factories.

Marks

3. Comment on the following action (any *five*) :— 10

(*a*) Commissioner and Registrar of Co-operative Societies, M.S., Pune transfers Joint Registrar, Co-operative Societies.

(*b*) Divisional Joint Registrar, Co-operative Societies promotes Class-III staff of his division.

(*c*) Commissioner of Sugar, purchases furniture worth Rs. 1.00 Lakh for his office.

(*d*) Assistant Registrar of Co-operative Societies, pays rent for his office.

(*e*) Divisional Joint Registrar, Co-operative Societies sanctions 180 days earned leave to Assistant.

(*f*) Regional Joint Director sanctions 45 days earn leave to his staff.

(*g*) Divisional Joint Registrar, Co-operative Societies sanctions diaries of District Deputy Registrar, Co-operative Societies of his division.

4. State the authority competent to exercise powers (any *five*) :— 10

(*a*) Registration of Co-operative Sugar Factory.

(*b*) Amendment to Bye-laws of State Level Urban Co-operative Bank.

(*c*) Authority to conduct Elections of Agricultural Produce Market Committee in the district.

(*d*) Authority to conduct election of Co-operative Housing Society.

(*e*) Power to sanction 'Deemed Conveyance Certificate' to Co-operative Housing Society.

(*f*) Authority to admit Appeal against the order passed by Divisional Joint Registrar, Co-operative Societies under section 13 of Maharashtra Co-operative Societies Act, 1960.

(*g*) To issue a Show cause Notice for removal of Board Directors of Agricultural Produce Market Committee under Maharashtra Agricultural Produce (Regulation) Act, 1967.

## PART "B"

(Solve any *two* questions.)

5. Differentiate (any *two*) :— 10

(*a*) Commissioner for Co-operation and Registrar of Co-operative Societies *and* Commissioner of State Co-operative Election Authority.

(*b*) Appeal *and* Revision.

(*c*) Urban Co-operative Bank *and* District Central Co-operative Banks.

(*d*) Annual General Body Meeting *and* Special General Body Meeting.

[ *Turn over*

Marks

6. Write short notes (any *two*) :— 10

(*a*) Co-operative Courts.

(*b*) State Co-operative Election Authority.

(*c*) Power of Registrar under section 156 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960.

(*d*) Appointment of Authorised Officer under Section 77A of Maharashtra Co-operative Societies Act, 1960.

7. (*a*) Explain the Procedure to give recovery certificate under section 101 of Maharashtra Co-operative Societies Act, 1960. 5

(*b*) Enquiry under section 83 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960. 5